MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

■ वर्ष : १२ अंक : ४ पाने : १२ ■ जून-जुलै २०१८ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

नेमेची येतो हा पावसाळा, असे म्हटले जाते. पण तो आपल्यासाठी दरवर्षी नवनवी आव्हाने घेऊन येतो. त्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात जय्यत तयारी करूनच ही आव्हाने पेलली जाऊ शकतात. पावसाळ्यात वीजपुरवठ्याचे संचलन करताना अनेक प्रश्न उभे राहतात. त्यामुळे अधिक दक्षतेने यंत्रणा सुसज्ज ठेवणे, हाच सर्वोत्तम मार्ग असून तोच आपण दरवर्षी अनुसरत आहोत. अर्थात, निसर्गाचा पाऊस दरवर्षी सारखा नसतो. त्याची तीव्रता सारखी नसते. त्यामुळे कितीही तयारी केली तरी पावसाळ्यात प्रकल्पाची कामे धीम्या गतीने होतात, असा आतापर्यंतचा अनुभव आहे. अर्थात, हा वेळ पावसाळ्याशी संबंध नसलेली इतर प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी वापरणे आवश्यक आहे. आणि त्यासाठीचे व्यवस्थापन पावसाळ्यापूर्वीच केले गेले पाहिजे.

- *पावसाळ्यात कर्मचाऱ्यांनी काळजी घ्यावी*
- *आपत्कालीन व्यवस्थापन गरजेचे*
- *प्रलंबित कामे गतीने करावीत*
- *महानिर्मिती व महावितरणशी समन्वय हवा*

पावसाळ्यात जसा पाऊस पडतो, तशी वादळी हवाही असते, त्यामुळे टॉवर पडणे, वायर तुटणे असे प्रकार होतात. त्यासाठी टॉवरटॉप पेट्रोलिंग, गाऊंड पेट्रोलिंग, ट्री कटिंग व तत्सम बाबी आणखी सक्षम करण्याची गरज आहे. आणखी एक प्रश्न म्हणजे जुनी झाडे उन्मळून टॉवरवर पडतात किंवा त्याच्या फांद्या तारांवर पडून अपघात होतात. त्यातून कधी-कधी तर जीवितहानी व वित्तहानी होते, अशी धोक्याची झाडे आधीच ओळखून त्यांची छाटणी केली पाहिजे. प्रतिबंधित क्षेत्रात यासंबंधी जास्त काळजी घेणे गरजेचे आहे.

या काळात लाईटनिंगपासून संरक्षणासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. सबस्टेशनमधील लाईटनिंग अरेस्टर सुस्थितीत असणे, सबस्टेशनमधील अर्थ-वायर व्यवस्थित असणे तसेच पारेषण वाहिन्यांवरील अर्थ-वायर सुस्थितीत असणे इत्यादी महत्त्वाच्या बाबींची पूर्तता करणे आवश्यक असते. उपकेंद्रातील स्वीचयार्डमधील मार्शलिंग बॉक्स/जंक्शन बॉक्स, सर्किट ब्रेकर मेकॅनिझम बॉक्स ट्रॉन्स्फॉर्मवरील बुकोल्स रिले, पी.आर.व्ही.उपकरण यांना प्लॅस्टिकचे आवरण आवश्यक आहे.

उपकेंद्राचे बांधकाम करताना कंट्रोल रुम (नियंत्रण खोली), ड्रेनेज सिस्टीम याचा विचार व्हावा. जेणेकरून पावसाळ्यात तुंबलेल्या पाण्याचा निचरा होईल. यावर्षी मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे वसई उपनगराच्या १०० के.व्ही.वसई उपकेंद्रात पाणी साचले. स्वीचयार्ड व कंट्रोल रुममध्ये पाणी साचले. पर्यायाने विद्युत पुरवठा बंद करावा लागला. वसईचा हा अनुभव आपल्याला पुढील दक्षतेसाठी धडा झाला आहे. अतिवृष्टीत कोठे पाणी साचू शकते, यावर लक्ष ठेवून उपकेंद्रांत किंवा त्याच्याजवळ पाणी साचणार नाही, याची दक्षता पावसाळा संपताच करावी लागणार आहे. तरीही काही ठिकाणी पाणी साचणार हे गृहीत धरून तेथे आपत्कालीन व्यवस्थापन करून पंपिंगची व्यवस्था तयार ठेवली पाहिजे.

पावसाळ्यातील कामे अधिक जोखमीची असतात, त्यामुळे या काळात सेफ्टी बेल्ट, सेफ्टी शूज, हॅन्डग्लोज, हेल्मेट वापरण्यात हयगय होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. ही खबरदारी न घेतल्याने काम करताना दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी कर्मचाऱ्यांचा अतिआत्मविश्वास व निष्काळजीपणा कामाचा नाही, हे कायम लक्षात ठेवले पाहिजे. आपले `लक्ष्य` शून्य अपघाताचे असून त्यासाठी सुरक्षा सप्ताह कार्यक्रमातून जनजागृती केली गेली आहे. त्याचा विसर पडता कामा नये.



**पराग जैन नानोटिया** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

आपले काम हे टीमवर्क तर आहेच, पण महानिर्मिती व महावितरण कंपन्यांशीही सतत समन्वय ठेवून करण्याचे आहे. तसेच आपल्या कामाचा दर्जा दरवर्षी वाढतो आहे, हे तपासून पाहण्याची ही एक संधीही आहे. त्या संधीचा वापर आपण अधिक चांगला करून कंपनीचा गौरव वाढविला पाहिजे.

कर्मचारी व संघ यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना वाव मिळण्यासाठी तसेच कंपनीच्या कामकाजामध्ये, पारेषण सेवेमध्ये उत्कृष्टता आणण्यासाठी Innovations at MSETCL ही योजना सुरु करण्यात आली आहे. याबाबतच्या अंमलबजावणीकरिता कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये कर्मचारी व संघांनी सहभागी व्हावे, असे मी सर्वांना आवाहन करतो. तसेच कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांना कंपनीच्या अंतर्गत सुधारणाकरिता काही सूचना द्यावयाच्या असतील तर त्यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात देण्याचे मी आवाहन करतो.

**शुभेच्छांसह..!**

**– पराग जैन नानोटिया**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

■ विधानसभा प्रश्नोत्तरे ■

# मागणीएवढी वीज उपलब्ध, तुटवडा नाही : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण, नागपूर*

राज्यात विजेची जेवढी मागणी आहे, तेवढी वीज उपलब्ध आहे. विजेचा कोणताही तुटवडा राज्यात नाही. उलटपक्षी कमी मागणी असल्यामुळे अनेक वीजनिर्मिती केंद्र बंद ठेवावे लागत असल्याची माहिती ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.

आ. अजित पवार यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात ते बोलत होते. यावर्षी राज्याच्या महावितरण, महापारेषण कंपनीने २३७०० मेगावॉट इतकी सर्वोच्च विजेची मागणी पूर्ण करून कोणताही अपघात न होता वीजपुरवठा केला आहे. अमरावती जिल्ह्यात कमी दाबाच्या वीजपुरवठ्याची तक्रार आहे. कमी दाबाचा वीजपुरवठा काही भागात केला जातो, असे सांगून ऊर्जामंत्री म्हणाले, अमरावती जिल्ह्यात ४२४ कोटींची विजेची कामे झाली असून २२५ कोटी रुपये पुन्हा देण्यात येत आहे. राज्यात दीनदयाल आणि आयपीडीएस या योजनेअंतर्गत ५००० कोटींची कामे सुरु आहेत.



राज्यातील शेतकऱ्यांसाठी अडीच ते साडेतीन हजार मेगावॉट वीज दररोज लागते. ही वीज दिवसा व रात्री पुरवावी लागते. काही भाग दिवसा व काही भाग रात्रीला द्यावा लागते. सर्वांना दिवसाच वीज देण्याचा विचार केला तर यंत्रणेवर अधिक भार येईल व यंत्रणा चालणार नाही, असेही ते म्हणाले.

---

## विधानपरिषद प्रश्नोत्तरे

■ प्रलंबित कृषीपंपांना डिसेंबर २०१९ पर्यंत वीज कनेक्शन ■


# आतापर्यंत ५ लाख कृषीपंपांना दिले कनेक्शन

■ *टीम महापारेषण, नागपूर*

राज्यातील विद्यमान भाजपा-शिवसेनेच्या शासनाने आतापर्यंत विदर्भ मराठवाड्यासह ५ लाख कृषीपंपांना विजेचे कनेक्शन दिले आहे. सुमारे २.३५ लाख शेतकऱ्यांनी पैसे भरूनही त्यांना विजेचे कनेक्शन मिळाले नाही त्यांना एचव्हीडीएस योजनेअंतर्गत येत्या डिसेंबर २०१९ पर्यंत कनेक्शन दिले जातील, अशी माहिती ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तरांच्या तासात दिली.

आ. प्रकाश गजभिये यांनी कृषीपंप वीज कनेक्शन व या कामासाठी निविदा भरण्यास कंत्राटदार तयार नसल्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या संदर्भात बोलताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले,``कंत्राटदारांचा प्रश्न सीएसआर दराचा आहे. संपूर्ण राज्यात कंत्राटदारांसाठी एकच सीएसआर दर आहे. राज्यात विदर्भ वगळता अन्य ठिकाणी सर्व कंत्राटदार एकाच सीएसआर दरावर कामे करीत आहेत. पण विदर्भातील कंत्राटदारांनी मात्र ३० टक्के अधिक दराची मागणी केली आहे. सीएसआरपेक्षा ३० टक्के अधिक दर देता येणार नाही. बाजारात सध्या या कामाचे काय दर आहेत, याचा अंदाज घेतला जात आहे. ८ टक्के दरवाढ देण्यास आपण मंजुरी दिली होती. पण कंत्राटदारांनी निविदा भरल्या नाहीत. आतापर्यंत कंत्राटदारांसोबत ४ बैठकी झाल्या आहेत. एक शेवटची बैठक घेण्यात येत आहे. त्या बैठकीनंतर आपण यावर निर्णय घेऊ. राज्यात अनेक ठिकाणी एचव्हीडीएस योजनेचे काम सुरु झाले. पण, विदर्भात मात्र अजून काम सुरु झाले नाही, याकडेही ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

---



***महापारेषणची सद्यस्थिती***

१५५८ सर्किट कि.मी.अति उच्च दाब वाहिन्या उभारणे प्रस्तावित





■ ऊर्जा बचत व ऊर्जेचा प्रभावी वापर ■

# ऊर्जा कार्यक्षमता सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अग्रेसर

■ *टीम महापारेषण, मुंबई*

ऊर्जा बचत व कार्यक्षमता क्षेत्रात नवी नाममुद्रा उमटवत महाराष्ट्र देशात अग्रेसर राज्य ठरले आहे.

देशात ऊर्जा बचतीच्या दिशेनं महत्त्वाचं पाऊल उचलत नीती आयोगाने प्रथमतःच राज्यांचा ऊर्जा कार्यक्षमता सज्जता निर्देशांक तयार केला आहे. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाअंतर्गत कार्यरत ऊर्जा दक्षता ब्युरोच्या सहकार्याने देशातील सर्वच राज्यांकडून माहिती संकलित करण्यात आली. या माहितीच्या आधारावर ऊर्जा बचतीच्या क्षेत्रातील अग्रेसर राज्यांची निवड करण्यात आली असून, यात महाराष्ट्राचा समावेश आहे. महाराष्ट्रासह अग्रेसर राज्यांमध्ये आंध्र प्रदेश, केरळ,पंजाब आणि राजस्थान या राज्यांचाही समावेश आहे.

ऊर्जा बचत योजनांची अंमलबजावणी, आर्थिक कार्यप्रणाली, संस्थात्मक क्षमता,ऊर्जा बचत व कार्यक्षमता या विषयांवर विविध राज्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला व निर्धारित गुणांकनाच्या आधारे निर्देशांक तयार करण्यात आला.या निर्देशांकात बांधकाम, उद्योग, कृषी, महानगरपालिका आणि वाहतूक क्षेत्रांमध्ये विविध ६३ निकष व ४ विश्लेषणात्मक निर्देशांकानुसार परीक्षण करण्यात आले. त्यानुसार देशातील सर्व राज्यांना चार श्रेणींमध्ये विभागण्यात आले. अग्रेसर राज्य, साध्यक राज्य, स्पर्धक आणि आकांक्षित अशा चार श्रेणींमध्ये ही विभागणी करण्यात आली असून महाराष्ट्र अग्रेसर राज्यांच्या श्रेणीत आहे.



बांधकाम क्षेत्रातील ऊर्जा बचतीबाबतच्या विविध निकषांवर करण्यात आलेल्या गुणांकनात महाराष्ट्राला ३० पैकी १४ गुण मिळाले आहेत. औद्योगिक क्षेत्रातील ऊर्जा बचतीच्या निकषांवरील गुणांकणात २५ पैकी १७.५, महानगरपालिका क्षेत्रातील ऊर्जा बचतीमध्ये १० पैकी ८ , वाहतूक क्षेत्रातील ऊर्जा बचतीमध्ये १५ पैकी १३ आणि कृषी क्षेत्रातील ऊर्जा बचतीत १५ पैकी ९ गुण महाराष्ट्राने मिळविले आहेत. तसेच, विश्लेषणात्मक निर्देशांकात महाराष्ट्राने ५ पैकी ४ गुण मिळविले आहेत.

नीती आयोगाने प्रथमतःच राज्यांचा ऊर्जा कार्यक्षमता सज्जता निर्देशांक तयार केला असून देशातील विविध राज्यांमध्ये ऊर्जा बचत व ऊर्जेचा प्रभावी वापर करण्याच्या दिशेने आखण्यात येणाऱ्या नियोजनासाठी याचा फायदा होणार आहे.




**बीड :** विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनकडून पदाधिकाऱ्यांसाठी घेण्यात आलेल्या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सर्वश्री सुगत गमरे, शेजारी संघटनेचे अध्यक्ष आर.जे.देवळे, सरचिटणीस रवींद्र देवकांत, महापारेषणचे मुख्य औदयोगिक संबंध अधिकारी अनंत पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी.

## ■ बीडमध्ये तांत्रिक कामगार युनियनची पदाधिकारी कार्यशाळा ■

# कर्तव्य, जबाबदारी आणि नेतृत्व विकास विषयावर मार्गदर्शन

■ *टीम महापारेषण, बीड*



विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनकडून तिन्ही वीजकंपनीतील विभाग ते प्रादेशिक स्तरावरील पदाधिकाऱ्यांसाठी कर्तव्य, जबाबदारी व नेतृत्व गुणविकास या विषयावर पदाधिकारी कार्यशाळा घेण्यात आली.

सुरवातीला कार्यशाळेचे उदघाटन महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष श्री. आर.जे.देवळे होते. यावेळी महापारेषणचे मुख्य औदयोगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, महावितरणचे उपमहाव्यवस्थापक श्री. रोहित ठाकूर उपस्थित होते.

कार्यशाळेला मार्गदर्शन करताना श्री. सुगत गमरे म्हणाले, ``संघटना आणि व्यवस्थापन एकमेकांचे शत्रू नसून संघटना व्यवस्थापनाचा आरसा म्हणून काम करत असते. ऊर्जा क्षेत्रातील वाढती स्पर्धा पाहता संघटना आणि व्यवस्थापन यांनी एकमेकांना समजून घेऊन काम केले तर हे क्षेत्र नक्कीच पुढे जाईल.``

यावेळी महापारेषणचे श्री. अनंत पाटील यांनीही मार्गदर्शन केले. महावितरणचे उपमहाव्यवस्थापक श्री. रोहित ठाकूर यांनी एम्प्लॉई पोर्टल ऍपबाबत माहिती दिली. नेतृत्वगुण विकास संबंधाने यशदाचे प्रशिक्षक डॉ. रागीब अहमद यांनी मार्गदर्शन केले. संघटनेचे सरचिटणीस श्री. आर.टी.देवकांत यांनी कार्यशाळेमागची भूमिका सांगितली. याप्रसंगी सर्वश्री रवी बारई, बी.आर.पवार, गजानन सुपे, प्रवीण पाटील, दिलीप कोरडे, संतोष घाडगे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. उदय मदुरे यांनी केले.



## *महापारेषणची सद्यस्थिती*

मार्च २०१८ अखेरपर्यंत १२ नवीन अति उच्च दाब उपकेंद्रे





**नांदेड :** महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेच्या वतीने आयोजिलेल्या महापारेषण तांत्रिक कामगार मेळाव्याचे उदघाटन करताना महापारेषण कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.)(प्रभारी) सर्वश्री सुगत गमरे, शेजारी अविनाश कोंडावार, अनंत पाटील, भाऊसाहेब भाकरे, सय्यद जहिरोद्दीन व अन्य पदाधिकारी.

## ■ वीज तांत्रिक कामगार संघटनेचा मेळावा ■

# महापारेषणच्या आकृतीबंधाचे काम अंतिम टप्प्यात

■ *टीम महापारेषण, नांदेड*

महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महापारेषण तांत्रिक कामगार मेळाव्याचे उदघाटन महापारेषण कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते झाले. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष श्री. भाऊसाहेब भाकरे होते.

श्री. सुगत गमरे म्हणाले की, देशाला आज विजेची गरज मोठ्या प्रमाणात आहे व त्यावरच देशाची प्रगती अवलंबून आहे. यात महापारेषण कंपनीची कामगिरी महत्त्वाची आहे. यामुळे महापारेषणच्या नफ्यात वाढ होत चालली आहे. यावर्षी हा नफा ५५० कोटींवर गेला आहे.

यावेळी महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सर्वश्री अनंत पाटील, मुख्य अभियंता अविनाश कोंडावार, अधीक्षक अभियंता शिवशंकर स्वामी, एम. सी. वाळके, अनिल भारसाखळे, कार्यकारी अभियंता माधव सोनकांबळे, मिलिंद बनसोडे, संजीव रामटेके, संघटनेचे केंद्रीय कोषाध्यक्ष ताराचंद कोल्हे, उपसरचिटणीस आर. पी. थोरात, उपकार्यकारी अभियंता प्रशांत म्हस्के, जी. सी. थळंगे, हणमंत अडबलवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मेळाव्याचे स्वागताध्यक्ष इंजि. रोहिदास आल्हाट यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि संघटनेची होत असलेली प्रगती सांगितली. संघटनेचे सरचिटणीस सय्यद जहिरोद्दीन यांनी प्रास्ताविक केले. सुत्रसंचालन श्याम कोरडे यांनी केले तर जगन गोणारकर यांनी आभार मानले.



## *महापारेषणची सद्यस्थिती*

५३६० एम.व्ही.ए.स्थापित क्षमतेत वाढ



### ■ पुरेशा दाबाने वीजपुरवठा होणार ■

# शहादा येथे १३२/३३ के.व्ही. ट्रान्स्फॉर्मर कार्यान्वित

■ ***टीम महापारेषण, नंदुरबार***

२२० के.व्ही.उपकेंद्र शहादा जिल्हा नंदुरबार येथे नवीन १३२/३३ के.व्ही.५० MVA ट्रान्स्फॉर्मर नं.३ सुरळीतपणे कार्यान्वित करण्यात आला. यामुळे शहादा तालुक्यातील गावांना योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.

शहादा उपकेंद्र येथे यापूर्वी ३३ के.व्ही.चे फक्त दोन ट्रान्स्फॉर्मर होते. परंतु, वाढत्या वीजमागणीचा विचार करून हा नवीन ट्रान्स्फॉर्मर बसविण्यात आला. टेस्टींग टीम, एजन्सी व उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेऊन तात्काळ ट्रान्स्फॉर्मर कार्यान्वित केला.

या कामासाठी अधीक्षक अभियंता, भुसावळचे सर्वश्री चुडे, कार्यकारी अभियंता धुळेचे अष्टीकर, कार्यकारी अभियंता भामरे, गिरासे, शरद माळी, श्रीकांत पाटील, पी.आर.राठोड, एस.व्ही.कोळी, जे.एन.ठाकूर यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**शहादा जि. नंदुरबार :** २२० के.व्ही.उपकेंद्रात नवीन १३२/३३ के.व्ही.५० MVA ट्रान्स्फॉर्मर नं.३ कार्यान्वित करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे अधिकारी व कर्मचारी वर्ग.

---

### ■ पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती ■

# महापारेषणचा १३ वा वर्धापनदिन थाटात साजरा




■ ***टीम महापारेषण, कराड***

कराड परिमंडलात महापारेषण कंपनीचा १३ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणच्या कामकाजाविषयी व सुरक्षेविषयी पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. सुरवातीला परिमंडल कार्यालयात अधीक्षक अभियंता सौ. छाया साळे यांच्या हस्ते केक कापून वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी परिमंडलातील जिल्हानिहाय स्थापित क्षमतेसह उपकेंद्रे व विद्युत वाहिन्यांची माहिती व विद्युत सुरक्षाविषयी माहितीचे सादरीकरण करण्यात आले.

कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत पेटकर लिखित पथनाटय एकूण अकरा ठिकाणी सादर करण्यात आले. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. एस.जे.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथनाट्यातून महापारेषणविषयी व सुरक्षेविषयी जनजागृती करण्यात आली. अधीक्षक अभियंता श्री. आर.पी.चव्हाण, सौ. छाया साळे, सौ. कुंभार, श्री. डडमल, श्री. कसबेकर यांचे कार्यक्रमाला सहकार्य लाभले.

---



## *महापारेषणची सद्यस्थिती*

१६०० सर्किट कि.मी. अति उच्च दाब उभारणीचे काम पूर्ण



## हौशी मराठी राज्य नाटयस्पर्धा

■ विभागीय पारितोषिक वितरण समारंभ थाटात ■

# महापारेषणच्या सुईधागा नाटकाचा गौरव

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ५७ व्या हौशी मराठी राज्य नाट्यस्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील चित्र-नाट्यसृष्टीतील मान्यवरांच्या हस्ते विभागीय पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

प्राथमिक फेरीत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या सुईधागा या नाटकाने प्रथम क्रमांक मिळविला. उत्कृष्ट अभिनय रौप्यपदकासाठी महापारेषणच्या पल्लवी देशपांडे यांची निवड करण्यात आली. श्री. कुणाल आळवे (दिग्दर्शन, प्रथम पारितोषिक), रॉबिन लोपीस (नेपथ्य, प्रथम पारितोषिक), संजय तोडणकर (प्रकाशयोजना, व्दितीय पारितोषिक) यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील उपस्थित होते.




**मुंबई :** महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ५७ व्या हौशी मराठी राज्य नाट्यस्पर्धेत महापारेषणच्या सुईधागा नाटकाने प्रथम क्रमांक मिळविला. त्याप्रसंगी पारितोषिक स्वीकारताना महापारेषणचे अधिकारी व कलावंत.

# महानिर्मितीच्या स्वतंत्र संचालकपदी (महिला) श्रीमती जुईली वाघ



*श्रीमती जुईली वाघ*


*टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनीच्या स्वतंत्र महिला संचालकपदी महापारेषणच्या अधीक्षक अभियंता (संवसु) श्रीमती जुईली मिलिंद वाघ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती तीन वर्षासाठी आहे.

महावितरण कंपनीच्या मंडळामध्ये स्वतंत्र संचालक (महिला) म्हणून २०१४-२०१५ पासून श्रीमती जुईली वाघ कार्यरत आहेत. महापारेषणमध्ये प्रकल्प, संवसु, सांघिक कार्यालय तथा विभागीय कार्यालयात तांत्रिक, वित्त तसेच मानव संसाधन अशा विविध विभागांतील त्यांना १२ वर्षांचा अनुभव आहे.

# उच्च शिक्षणासाठी श्रीनिधी अडके अमेरिकेला रवाना

*टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*



*श्रीनिधी अडके*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या सांघिक कार्यालयातील श्री.श्रीधर अडके यांचा मुलगा श्रीनिधी अडके उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना झाला आहे. अमेरिकेतील जॉजिया विद्यापीठात Artificial Intelligence या विषयातील मास्टर ऑफ सायन्स ही पदवी घेण्यासाठी जॉर्जिया या विद्यापीठात शिक्षणासाठी रवाना झाला आहे. .

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती जून-जुलै २०१८

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | **श्री. शशिकांत बाकरे** | अधीक्षक अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय | ३०.०६.२०१८ |

झाडे लावा, झाडे वाचवा

# ओगलेवाडी उपकेंद्रात वृक्षारोपण



**ओगलेवाडी :** महापारेषणच्या २२० के.व्ही.उपकेंद्र कर्मचारी वसाहत ओगलेवाडी (कराड) येथे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी श्री. सागर शिवदास व श्री. चंद्रकांत मदने यांच्यासह अधिकारी व कर्मचारी.

■ *टीम महापारेषण, कराड*

महापारेषणच्या २२० के.व्ही.उपकेंद्र कर्मचारी वसाहत ओगलेवाडी (कराड) येथे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य श्री. सागर शिवदास व पंचायत समिती सदस्य श्री. चंद्रकांत मदने यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. अतुल मणूरकर, श्री. विजयानंद सोरटे, श्री. अभिमन्यू राख, श्री. घम, श्री. मुल्ला, श्री. कोळेकर, श्री. जाधव, श्री. शशांक नांगरे-पाटील उपस्थित होते.



**नागपूर :** अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडल, नागपूर येथे मुख्य अभियंता श्री. विकास बढे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी.

# नागपूर परिमंडलात वृक्षारोपण

■ *टीम महापारेषण, नागपूर*

अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडल, नागपूर येथे मुख्य अभियंता श्री. विकास बढे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी परिमंडळ कार्यालयातील श्री. सतीश अणे, श्री. अविनाश निंबाळकर, श्री. पी.जी. दामके, श्री. महेश सावंत, श्री. पीयूष चिक्षे, सौ. प्रणोती बुंदाले, श्री.एस.एम.दुर्गे, श्री. एस.एस. सेवलकर, एस.एस.कारेकर, श्री. राहुल बारापात्रे, श्री. आर.एस. कुंभरे,, श्री. ए.एन. मारबते यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ■ नागपूर, औरंगाबाद परिमंडलात मा.सं.विभागाची आढावा बैठक ■

# झिरो पेंडन्सी वर्क करण्याचे दिले निर्देश

■ *टीम महापारेषण, नागपूर/औरंगाबाद*

नागपूर व औरंगाबाद परिमंडलात मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या अध्यक्षतेखाली मानव संसाधन विभागाचा आढावा घेण्यात आला.

यावेळी महाव्यवस्थापक (मा.सं., मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड उपस्थित होते. सुरवातीला नागपूर कार्यालय येथे परिमंडलात येणाऱ्या सर्व प्रविभाग, विभागीय स्तरावरील मा.सं.विभागाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. विविध प्रश्नांचा आढावा घेऊन ते त्यावर चर्चा करून ते प्रश्न निकालात कसे काढता येतील, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा. सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांनी मा.सं.विभागातील अधिकाऱ्यांकडून कामाबद्दलच्या अपेक्षा व्यक्त केल्या. मानव संसाधन विभागाची वाटचाल झिरो पेंडन्सीकडे (शून्य प्रलंबित प्रकरणे) नेण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच आढावा बैठकीनंतर मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

औरंगाबाद परिमंडलातही मा.सं.विभागाची आढावा बैठक मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी महाव्यवस्थापक (मा.सं., मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड उपस्थित होते.



*महापारेषणची सद्यस्थिती*

४६२१८ सर्किट कि.मी.अति उच्च दाब वाहिन्या कार्यान्वित





**अकोला :** अमरावती परिमंडलातर्गत शिबिरात सहभागी झालेले प्रशिक्षणार्थी.

# अकोल्यात विद्यार्थ्यांकरिता प्रशिक्षण शिबिर

■ *टीम महापारेषण, अमरावती/अकोला*

अमरावती परिमंडलातर्गत ज्ञानप्रकाश प्रशिक्षण केंद्र अकोला येथे जून व जुलै महिन्यामध्ये विविध प्रशिक्षण घेण्यात आले. त्यामध्ये विद्युत अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकरिता १५ दिवसीय उन्हाळी प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले.

जुलै महिन्यामध्ये 'प्रशिक्षण आपल्या दारी' अंतर्गत २२० के. व्ही. उपकेंद्र चिखली, बाळापूर, बडनेरा, १३२ के. व्ही. उपकेंद्र गुंज, अकोला, चांदूर बाजार येथील कर्मचाऱ्यांकरिता प्रत्येक उपकेंद्रामध्ये एकदिवसीय know your sub-station प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच Sub-Station Diagnostic Testing, QM Source Inspection, सेवा विनियम, या विषयानवर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. Knowledge Sharing Scheme अंतर्गत ABB SCADA या विषयावर चाचणी, दूरसंचार, संवसु विभागात कार्यरत असलेल्या अभियंत्यांकरिता प्रात्यक्षिकासह कार्यशाळा घेण्यात आली.

प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी श्री. रूपेश फरकाडे, अधिक्षक अभियंता, चाचणी व दूरसंचार मंडळ अकोला तथा प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख, श्री. पुरूषोत्तम लाजूरकर, कार्यकारी अभियंता ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग, अकोला, श्री. नितीन कांबळे सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.), प्रशिक्षण केंद्राच्या समन्वयिका सौ. चारुलता काळे यांनी परिश्रम घेतले.

# चंद्रपुरात विविध प्रशिक्षण उपक्रम

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

ज्ञानदीप नागपूर परिमंडलीय, महापारेषण प्रशिक्षण केंद्र, एच.व्ही.डी.सी.चंद्रपूर येथे विविध प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये १५ दिवसीय औद्योगिक प्रशिक्षण विविध अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या १०० विद्यार्थ्यांना देण्यात आले.

या प्रशिक्षणाच्या उदघाटन समारंभाला सर्वश्री आत्राम, अधीक्षक अभियंता, एच.व्ही. डी.सी. परिमंडल, चंद्रपूर, अविनाश वट्टी, सुनील सारडे, उमेश शेंडे, यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या आणि पुढील आव्हाने याबद्दल मार्गदर्शन केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांना पॉवर सिस्टिमच्या विविध पैलूंवर प्रशिक्षण देण्यात आले.



**चंद्रपूर :** येथे विविध प्रशिक्षण उपक्रमांतर्गत माहिती घेताना प्रशिक्षणार्थी.

# बाभळेश्वर येथे मोफत नेत्रतपासणी शिबिर

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ नाशिक अंतर्गत प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र बाभळेश्वर येथे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. विद्युत सुरक्षितता या विषयावर आयोजित प्रशिक्षणादरम्यान सर्व प्रशिक्षणार्थी तसेच ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग, बाभळेश्वर येथील अधिकारी व कर्मचारी यांचे डोळ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी बिर्ला सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल, नाशिक यांच्या सहकार्याने मोफत नेत्रतपासणी शिबीर घेण्यात आले. शिबिरात एकूण ८७ जणांची नेत्रतपासणी करण्यात आली.

शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्वश्री जयंत वीके, मुख्य अभियंता, नाशिक, किशोर जाधव अधीक्षक अभियंता संवसु मंडळ नाशिक, नासिर कादरी, अधीक्षक अभियंता, चाचणी व दूरसंचार मंडळ नशिक, प्रमोद गोडसे, सहा. महाव्यवस्थापक (मासं) नाशिक व एस. एल. लहरे कार्यकारी अभियंता, ४०० के.व्ही. ग्र.कें. बाभळेश्वर यांनी परिश्रम घेतले.



**बाभळेश्वर (जि.नाशिक) :** येथे आयोजिलेल्या मोफत नेत्रतपासणी शिबिरात तपासणी करताना अधिकारी व कर्मचारी.



**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंज्ञापन विभागात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे.



**मुंबई :** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या सचिवपदी श्री. अभिजित देशपांडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. अनिल कालेकर.



## *महापारेषणची सद्यस्थिती*

१० नवीन अति उच्च दाब उपकेंद्रे उभारणे प्रस्तावित



# तळंदगेत तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ साठी प्रशिक्षण

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषणच्या प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र तळंदगेत तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ साठी पायाभूत प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. यामध्ये ४४ कर्मचाऱ्यांनी आपला सहभाग नोंदविला. यावेळी सांघिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) सर्वश्री शशिकांत बाकरे, अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, कोल्हापूर अरविंद दडमल, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) अउदा स्थापत्य मंडल, कोल्हापूर अविनाश कसबेकर, सुनील माने, सुनील चौगुले उपस्थित होते.

याप्रसंगी अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. शशिकांत बाकरे यांनी प्रशिक्षणार्थींना ऊर्जा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान दररोज सकाळी योगाभ्यास वर्ग घेण्यात आला. कर्मचारी सेवाविनियम, संवाद कौशल्य, सांघिक भावना, सुरक्षेचे उपाय व सुरक्षा साधने, दैनंदिन कामकाजात पार पाडावयाची कर्तव्ये, वाहिनी मनोरा तसेच यंत्रसामुग्रीवर देखभालीसाठी चढणेबाबत व इतर तांत्रिक बाबींचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षण वर्ग यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षण केंद्र समन्वयक सर्वश्री नितीन डाके, सुनील माने, अविनाश कसबेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.




**तळंदगे (कोल्हापूर) :** येथे तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ साठी घेण्यात आलेल्या पायाभूत प्रशिक्षण शिबिराप्रसंगी वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी.

# पडघे येथे प्रेरण पातळी प्रशिक्षण शिबिर




**पडघे :** येथे आयोजिलेल्या प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेले अधिकारी व कर्मचारी.

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*


महापारेषण कंपनीत अनुकंपा तत्त्वावर निम्नस्तर लिपीक (मा.सं.) व तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ कर्मचाऱ्यांसाठी प्रेरण पातळी प्रशिक्षण विभागीय प्रशिक्षण केंद्र, पडघे येथे घेण्यात आले.

यावेळी देखभाल व चाचणी अभियंत्यांसाठी एक दिवसाचे User group training for Scope make circuit breaker analyzer with 6-channel DCRM kit प्रशिक्षण घेण्यात आले. ERP PM Module मध्ये कार्यरत अभियंत्यांसाठी तीन दिवसांचे Workshop for review of SOPs & Coding Codes शिबिर घेण्यात आले.



## *महापारेषणची सद्यस्थिती*

प्रस्तावित कामांसाठी १२०० कोटी रुपये खर्च अपेक्षित



# नवीन बदलांना स्वीकारा!

आपण सर्व जण एका नावाजलेल्या कंपनीत काम करत आहोत आणि ही कंपनी कोठून कोठे आली, तिच्या कामकाजाच्या पध्दतीत किती बदल झाले आणि सातत्याने होत आहेत, हे आपण पाहतोच आहोत. जे या बदलासोबत राहिले, ते पुढे गेले आणि ज्यांनी अपरिहार्य अशा बदलांकडे दुर्लक्ष केले, त्यांना मर्यादा आल्या.

बदल हा प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य भाग आहे. काळानुरुप, परिस्थितीनुरुप बदल होतच राहणार व त्यास स्वीकारून आपला उत्कर्ष साधता आला पाहिजे. मानव संसाधनाच्या तत्त्वानुसार आपल्या कार्यकुशलतेमध्ये आवश्यक बदल होणे गरजेचे आहेत. हा बदल प्रत्येक व्यक्तीने स्वतःहून केला पाहिजे. मनाची तयारी झाली तर बदल करण्यास सकारात्मक वातावरण निर्माण होते. होणाऱ्या किंवा भविष्यात येऊ घातलेल्या बदलांबाबत भीती निर्माण होणे नैसर्गिक आहे. मात्र, त्याचा सर्वांगिण अभ्यास करता आला पाहिजे. कारण, कोणताही बदल हा काळानुरुप व परिस्थितीनुरुप होत असतो. त्यामुळे त्याचे अवलोकन करून त्या बदलाकरिता तयार राहता आले पाहिजे. नाहीतर आपण काळाच्या ओघात मागे पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आपल्या देशात अनेक बदल होत आहेत आणि या बदलांनी आता तर अधिकच वेग पकडला आहे. त्यामुळे जे देशपातळीवर होणारे बदल आहेत, त्याविषयी मनात नकारात्मक विचार न आणता ते आत्मसात करण्याचे प्रयत्न आपण केले पाहिजेत. त्याचे उदा. म्हणजे देशात होत असलेली डिजीटल क्रांती. आपल्या आजूबाजूचा समाज आणि विशेषत: आपली मुले डिजिटल क्रांती आनंदाने स्वीकारताना दिसते आहे. कारण त्यामुळे आपली कामे सुलभ, अचूक, वेगवान आणि पारदर्शी होणार आहेत. आपण या बदलाविषयी मनात काही शंका ठेवल्या तर जग काही आपल्यासाठी थांबणार नाही. डिजिटल बदलाचे परिणाम आपण आपल्या कार्यालयीन कामांवर पहात आहोतच. दररोज द्यावी लागणारी हजेरी, आर्थिक व्यवहार, दोन कार्यालयांत होणारा पत्रव्यवहार, रेल्वे, विमानाची काढली जाणारी तिकिटे ही त्याची अगदी प्राथमिक उदाहरणे. पण हा बदल आता थांबणार नाही. त्यामुळे काळाची ही पाऊले ओळखून त्यात भाग घेतला पाहिजे. कारण तेच आपल्या सर्वांच्या हिताचे आहे.

आणखी एक मोठा बदल आपल्या क्षेत्रात आणि सर्वत्र पाहायला मिळतो आहे, तो म्हणजे तंत्रज्ञानाचा वाढता वापर. पूर्वी अनेक कामांत थेट काम करणारी माणसेच सहभागी होती, पण आता त्यांच्यासोबत तंत्रज्ञानाचा वाटा वाढला आहे. नव्हे, तंत्रज्ञानाच्या मदतीशिवाय आपण ती कामे कशी करत होतो, असा आता प्रश्न पडू लागला आहे.

आपण मागे राहिलो, अशी सेवेत असताना अनेकांना खंत असते. अशा सहकाऱ्यांनी आपण बदलानुसार स्वत:त बदल करून घेतले ना, याची खात्री करून घ्यावी आणि यापुढील संधी मिळविण्यासाठी यापुढील बदलांचे स्वागत करावे. हे महत्त्वाचे यासाठी आहे की बदलांचा वेग आता अधिकच वाढला असून तो समजून घेतल्यास तो स्वीकारण्याचा त्रास होत नाही. पण जे तो बदल स्वीकारतानाच पळवाटा शोधत असतात, त्यांना तो बदल शिक्षेसारखा वाटतो. आपल्याला पुढील काळातील बदलांकडे वरदान आणि अपरिहार्य म्हणून पाहायचे आहे की शिक्षा म्हणून पाहायचे आहे, हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे. कारण बदल कोणासाठीच थांबत नाहीत.




शुभेच्छांसह..!

**– सुगत गमरे**
**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.